या जागेसाठी
जाहिरात
घेणे आहे

दैनिक
लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
LOK AARAMBH
dainiklokaarambh@gmail.com
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर

प्रतिनिधी
नेमणे आहे.
बीड आंबेजोगाई गेवराई
वडवणी केज परळी
पाटोदा शिरूर कासार
धारूर आष्टी माजलगाव
इच्छुकाने संपर्क साधावा
94036 41482

बीड/महाराष्ट्र वर्ष २ रे | शनिवार १७ ऑगस्ट २०२४ | अंक२५१ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु

# देवेंद्र फडणवीस यांचे गणित फेल होणार, त्यांना पश्चाताप होणार: मनोज जरांगे यांचा पुन्हा फडणवीसांवर थेट हल्ला


## काय म्हणाले मनोज जरांगे

तुम्हाला येत्या 20 तारखेपर्यंत खूप परिस्थिती बदललेले दिसेल. देवेंद्र फडणवीस यांनी काही गणित बांधली आहेत. ती फेल होणार आहेत. त्यांना पश्चाताप होणार आहे. मला हलक्यात घेऊ नका. फडणवीस साहेब तुम्हाला समजून घ्यायचे नसेल तर माझाही नाईलाज आहे. देवेंद्र फडणवीस यांनी आरक्षण दिले तर मराठे त्यांना डोक्यावर नाचतील. तुम्ही आरक्षण दिले नाही तर आम्ही तुमचे राजकीय गणित बिघडवणार आहोत. देवेंद्र फडणवीस यांनी मला हसण्यावर घेऊ नये. नाहीतर त्यांचा बोऱ्या वाजेल, असे मनोज जरांगे यांनी म्हटले.

## मला राजकारणात आणू नका...

मला राजकारणात पाय ठेवायला लावू नका. मी राजकारणात आलो तर तुमचा सुपडा साफ होईल. मला व समाजाला राजकारणात जायचे नाही. मला त्यामध्ये ढकलू नका. मी जर गेलो तर तुम्ही बांधलेले गणित सगळे चुकणार आहेत. माझी राजकारणात यायची इच्छा नाही. मी जर एकदा घुसलो तर परिणामाची चिंता करत नाही. मी शेतकऱ्यांपासून 12 बलुतेदारांपर्यंतचे प्रश्न मांडत आहे. आता गोरगरीब मराठा शेतकऱ्यांचे राज्य आणल्याशिवाय मागे सरकणार नाही.

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी पुन्हा भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांना टार्गेट केले. देवेंद्र फडणवीस यांच्यामुळे आरक्षणाचा विषय रखडल्याचा आरोप मनोज जरांगे यांनी केला. यावेळी देवेंद्र फडणवीस यांचे गणित फेल होणार, त्यांना पश्चाताप करावा लागणार? असा थेट इशारा मनोज जरांगे यांनी दिला. सत्ताधाऱ्यांनी ठरवले आहे की गोरगरिबाला न्याय द्यायचा नाही, मग आता गोरगरिबांनी ठरवले आहे त्यांना खुर्ची द्यायची नाही. आता संघर्ष करायचा पण आता खुर्ची त्यांना द्यायची नाही. हीच भूमिका शेतकऱ्यांची आहे. सगळ्या जाती-धर्माच्या बांधवांची आहे. दलित मुस्लिमांची आहे, असे मनोज जरांगे यांनी म्हटले. ...तर माझ्यापुढे पर्याय नाही मी राजकीय भाषा बोलत आहे. कारण तुम्ही आ र क्ष ण देत नाही. तुम्ही आरक्षण द्या, मी राजकीय भाषा बंद करतो. परंतु तुम्ही आरक्षण देणार नसाल तर मग माझ्यापुढे पर्याय नाही. माझ्या समाजाचे मतदान घेऊन माझ्या समाजाच्या लेकरा बाळांचे वाटोळे करणार असाल आता तुम्हाला खुर्ची मिळू देणार नाही.



# शांताई अर्बन मध्ये स्वातंत्र्य दिन साजरा



**बीड प्रतिनिधी :-**

बीड-सामाजिक क्षेत्रात अग्रणी असलेल्या शांताई अर्बन मध्ये हर घर तिरंगा शासन अधिनियमानुसार 78 वां स्वतंत्र दिन साजरा करण्यात आला प्रमुख अतिथी म्हणून बीड येथील दंत रोग तंद्य डॉक्टर खामकर सर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले स्वतंत्र दिनाचे औचित्य साधून स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून गणेश रघुनाथ पुंडे यांची महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागात मापक म्हणून निवड झाल्याबद्दल मान्यवरांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला खामकर सर बोलताना म्हणाले की शांताई अर्बन तर्फे नेहमी सामाजिक उपक्रम केले जातात व्यक्तीमत्व विकासासाठी प्रयत्न केले जातात असे उपक्रम घेण्याचे काम सतत होत जावो असे मत त्यांनी मांडले व शांताई अर्बन च्या पुढील कार्यास शु भेच्छा दिल्या यावेळी शांताई अर्बनचे संस्थापक अध्यक्ष डॉ.ज्ञानेश्वर शिंदे, संस्थेचे उपाध्यक्ष संदीप वाघमारे, संचालक परमेश्वर शिंदे , संचालिका डॉ.सुनिता पोपळेआदी मान्यवर होते. शांताई अर्बनचे खातेदार सभासद राजकुमार ढोले, सतीश गलधर, रोहित जाधव,अमोल नवले इत्यादी भरपूर संख्येने उपस्थित होते तसेच बँक कर्मचारी व पिग्मी एजंट व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या पवनचक्की कंपन्यांचे काम थांबवा

## राष्ट्रीय महामार्गाच्या अधिकारी साहेबांनी संबंधित गुत्तेदारास सूचना द्याव्यात!!

**बीड (प्रतिनिधी)**

दि.१६ : बीड तालुक्यातील बालाघाटावरील १०-१२ गावांच्या परिसरात पवनचक्की उभारल्या जात आहेत. हे काम करणाऱ्या रेणू पॉवर, ओटू पॉवर, ग्रीन पॉवरसह इतर कंपन्यांचे अधिकारी, कर्मचारी शेतकऱ्यांसोबत अरेरावीची भाषा करतात. अनेकांना मोबदला मिळालेला नाही. अशा प्रकारे शेतकऱ्यांची अडवणूक करणाऱ्या पवनचक्की कंपन्यांचे काम तत्काळ थांबवावे, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्याकडे शुक्रवारी (दि.१६) केली आहे. निवेदनात पुढे म्हटले आहे की, बीड तालुक्यातील बालघाटावरील अनेक गावात पवनचक्की उभारल्या आहेत. हे काम करणाऱ्या कंपन्यांनी शेतीमध्ये टॉवर उभारले असून या टॉवरवरील



तारा ओढताना बीड तालुक्यातील बोरखेड ते हिंगणीपर्यंत शेती पिकांचे अतोनात नुकसान होणार आहे. त्याची शेतकऱ्यांना कसल्याही प्रकारची भरपाई दिली जात नाही. तसेच, टॉवर व विद्युत तारांमुळे बाधित होणाऱ्या शेतीची नुकसान भरपाई कंपनीने निश्चित केलेली नाही. त्यामुळे ही भरपाई देण्यासंदर्भात जिल्हा प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच, कंपनीकडून यापूर्वी शेतकऱ्यांना मोबदल्यापोटी चेक दिलेले आहेत, त्यापैकी अनेक चेक बाऊन्स झालेले असून ही एकप्रकारे शेतकऱ्यांची फसवणूक आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना भरपाई मिळत नाही, तोपर्यंत काम थांबविण्यात यावे. कंपन्यांबद्दल शेतकऱ्यांसह नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण असून जिल्हा प्रशासनाने हे प्रकरण गांभीर्याने घ्यावे, अशी मागणी डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे. यावेळी गोलंग्रीचे सरपंच श्रीकांत कवडे, घारगावचे सरपंच बालाजी ढास यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती.

### कंपन्यांवर कारवाई करू : जिल्हाधिकारी

डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या निवेदनानुसार, पवनचक्की कंपन्यांच्या अधिकारी, कर्मचाऱ्यांची बैठक घेऊन निवेदनातील नमूद विषयावर कार्यवाही करतो, असे आश्वासन जिल्हाधिकाऱ्यांनी दिले. तसेच, पीडित शेतकऱ्यांनी तक्रार करताना कंपनीसोबत केलेले करार पत्र, मिळालेले चेक, इतर कागदपत्रे सोबत जोडूनच अर्ज करावेत, अशा सूचनाही त्यांनी केल्या. दरम्यान, पवनचक्की कंपन्यांच्या मनमानीला चाप असेल, अशी अपेक्षा शेतकऱ्यांमधून व्यक्त केली जात होती.

# पै. सतीश आबा शिंदे यांचा गाव भेट दौऱ्याला जनतेकडून उत्स्फूर्त प्रतिसाद



**पाटोदा प्रतिनिधी:**

पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही जिल्हा परिषद गटातील पिठ्ठी येथील नागरिकांची भेट घेऊन, त्यांच्या अडचणी जाणून घेऊन, संवाद साधताना आष्टी मतदार संघाचे भावी आमदार पै. सतीश आबा शिंदे उपस्थित होते. येणाऱ्या विधानसभेच्या अनुषंगाने गाव भेट दौरा आयोजन करून प्रत्येक गावात जाऊन लोकांच्या समस्या जाणून घेऊन, त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी पै. सतीश आबा शिंदे यांनी कामे सुरू केले आहेत.त्यांच्या दौऱ्याला लोकांकडून उत्कृष्ट प्रतिसाद मिळत असून आमचे पुढचे भावी आमदार तुम्हीच अशी चर्चाही युवकांमध्ये दिसत आहे. त्यामुळे येणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीमध्ये कुठलाही पक्ष तिकीट देऊ, अथवा न देऊ, आबांनी निवडणूक लढवावी अशी मागणी युवकाकडून होत आहे. व नायगाव, पिठ्ठी, लिंबा देवी उखंडा, निरगुडी , डोमरी धसपिंपळगाव सगळे वाडी गारमाथा तसेच अनेक गावांमध्ये भेट दिली असता त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी उपस्थित पिठी गणातील मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते...

# पालकमंत्री धनंजय मुंडेंनी जिल्हा परिषदेच्या २५ वस्तीशाळा ईमारतीसाठी निधी दिला ; सामाजिक कार्यकर्त्यांच्या उघड्यावर शाळाआंदोलनाची दखल :- डॉ.गणेश ढवळे

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

बीड:- ( दि.१६)बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या ९८ वस्ती शाळा इमारत विरहित असुन ग्रामीण भागातील मुलांच्या शिक्षणासाठी पायाभूत सुविधांचा अभाव असुन गेल्या १० वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून उघड्यावर झाडाखाली, पत्र्याच्या शेडमध्ये , समाज मंदिरात अथवा किरायाच्या रुममध्ये वस्तीशाळा भरत असुन जिल्हा वार्षिक योजना सन २०२४-२५ अंतर्गत जिल्हा परिषदेच्या शाळांसाठी पायाभूत सुविधा निर्माण करणे या लेखाशिर्षाखाली ईमारत बांधकामासाठी निधी मंजूर करण्यात यावा यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली शेख युनुस,शेख मुबीन शेख मुस्ताक,शिवशर्मा शेलार, अशोक येडे यांनी दि.१२ आगस्ट रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्ष्यवेधी प्रतिकात्मक" उघड्यावर शाळा" आंदोलन करण्यात आले होते. याविषयी विविध दैनिकात बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. याची दखल ना.धनंजयजी मुंडे कृषीमंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री बीड यांनी घेऊन काल दि.१५ आगस्ट स्वातंत्र्य दिनी बीड जिल्ह्यातील २५ वस्तीशाळांच्या ईमारत बांधकामासाठी प्रत्येकी १० लाख रुपये असे एकुण २ कोटी ५० लाख रुपयांचा निधी मंजूर करण्यात आल्याची घोषणा केली.यामुळे वादळ वारा आणि पावसाळ्यात झाडाखाली ,



पत्र्याच्या शेडमध्ये ज्ञानार्जन करणा-या जिल्हा परिषदेच्या वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांना पक्की इमारत मिळणार असुन त्यांच्या अडचणी दूर होणार आहेत.याबद्दल सामाजिक कार्यकर्त्यांनी पालकमंत्री धनंजय मुंडे, जिल्हाधिकारी अविनाश पाठक, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद संगीतादेवी पाटील, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) भगवान फुलारी आणि शासन दरबारी आवाज उठवल्यामुळे प्रसारमाध्यमांनचे आभार मानले आहेत. बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या या २५ वस्तीशाळांना मिळणार हक्काची इमारत बीड जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या परळी तालुक्यातील १२ ( हेमा नाईक तांडा, महादेव तांडा,जांभुळ दरा तांडा,सारडगाव वस्ती, शिवाजी नगर सिरसाळा, नेहरू नगर सिरसाळा, राधाकृष्ण नगर सिरसाळा, विट भट्टी सिरसाळा, रेणुका नगर सिरसाळा महादेव वस्ती,माणिकनगर धर्मापुरी, डाग वस्ती, तर बीड तालुक्यातील ४ ( कोटुळेवस्ती, वायकर वस्ती,पवार वस्ती,हिंगे वस्ती) अंबेजोगाई तालुक्यातील ३ ( चनई तांडा ,उघडे वस्ती,कुसळवाडी तांडा क्रमांक २ १) पाटोदा तालुक्यातील ३ ( तांबे वस्ती,भांगे वस्ती,टोकवाड वस्ती) वडवणी तालुक्यातील १ वंजारवाडी वस्ती, आष्टी तालुक्यातील १ खेडकर गोठे वस्ती, शिरूर तालुक्यातील १ श्रृंगारवाडी अंतर्गत पांढरी वस्ती या एकुण २५ वस्तीशाळांतील विद्यार्थ्यांना हक्काची ईमारत मिळणार आहे. डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर मो.नं.८१८०९२७५७२

# महसुल विभागातर्फे पालकमंत्र्यांना निवेदन

**महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी पदाच्या पदोन्नत्यासह विविध मागण्यांचे निवेदन स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांना देण्यात आले.**

**बीड प्रतिनिधी :-**
बीड, दि. 16 , महसूल विभागातील उपजिल्हाधिकारी पदाच्या पदोन्नत्यासह विविध मागण्यांचे निवेदन स्वातंत्र्यदिनी पालकमंत्री धनंजय मुंडे यांना देण्यात आले. जिल्हाधिकारी अविनाश पाठक आणि उपजिल्हाधिकारी महेंद्र कांबळे उपजिल्हाधिकारी ओंकार देशमुख तसेच उपजिल्हाधिकारी प्रमोद कुदळे आणि उपजिल्हाधिकारी गौरव इंगोले यांनी हे निवेदन पालकमंत्री मुंडे यांना दिले. या मागण्या मान्य न झाल्यास दोन सप्टेंबर पासून सर्व उपजिल्हाधिकारी गांधी टोपी घालून आंदोलन करणार आहेत.

या सारखे निवेदन संपूर्ण राज्यात प्रत्येक जिल्हा मुख्यालयात देण्यात आले आहे.या निवेदनातील मागण्या खालीलप्रमाणे आहे.

उपजिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी संवर्गातील ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करण्याची बाब जवळपास अडीच वर्षांपासून प्रलंबित आहे. उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर येथे दाखल रिट याचिका क्रमांक 9163/2022 व इतर 6 याचिका दि. 8 ऑगस्ट 2024 रोजीच्या आदेशान्वये उच्च न्यायालयाने अंतिमतः निकाली काढल्या आहेत. त्यामुळे जेष्ठता सूची प्रसिद्ध करण्यास कोणतीही बाधा राहिलेली नाही. ज्येष्ठता सूचीअभावी उपजिल्हाधिकारी (निवडश्रेणी) 200 पैकी 198 पदे, अपर जिल्हाधिकारी 132 पैकी 85 पदे, अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) 68 पैकी 68 पदे अशी एकूण जवळपास 300 पदे पदोन्नतीअभावी रिक्त आहेत.

त्यामुळे तहसीलदार व नायब तहसीलदार यांच्या पदोन्नत्या थांबल्या आहेत. त्याचा परिणाम महसूल सहायक ते वरिष्ठ लिपिक, वरिष्ठ लिपिक ते नायब तहसीलदार, तलाठी मंडळ अधिकारी व मंडळ अधिकारी नायब तहसीलदार असे सुमारे 4000 अधिकारी कर्मचारी प्रभावित झालेले आहेत. त्यामुळे महसूल अधिकाऱ्यांवर अन्याय होत असल्याची भावना आहे. नियतकालिक पदोन्नतीबरोबरच या संवर्गाच्या पुढील प्रमाणे मागण्या आहेत.

उपजिल्हाधिकारी व अपर जिल्हाधिकारी संवर्गाच्या ज्येष्ठता सूची दर वर्षी नियमितपणे प्रसिद्ध करणे. उप जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील 200 पैकी 198 रिक्त पदे, अपर जिल्हाधिकारी संवर्गातील 85 पदे, अपर जिल्हाधिकारी (निवडश्रेणी) संवर्गातील 68 पदे पदोन्नतीने तात्काळ भरणे.

10 वर्षे व 20 वर्षे अर्हताकारी सेवा पूर्ण केल्यानंतर मिळणाऱ्या सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेस असणारे सर्व अधिकारी कर्मचारी यांना योजनेचा लाभ तात्काळ देणे. भारतीय प्रशासकीय सेवेतील पदांचा नियमित आढावा घेऊन पदसंख्येत योग्य ती वाढ करण्याचा प्रस्ताव केंद्र शासनास सादर करणे. महसूल भवनाकरिता भूखंड देण्यात आलेला असून त्याच्या विकासाकरिता निधी देऊन सुसज्ज महसूल भवन निर्मिती करणे. विभागीय चौकशी प्रस्तावीत होऊन दीर्घकाळ प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करून सदर अधिका-यांना पुढील सेवाविषयक लाभ देणे. परिविक्षाधीन कालावधी नियमित करणे व स्थायीकरण करण्याचे प्रस्ताव विभागाने नियमित आढावा घेऊन तातडीने मंजूर करणे. सेवानिवृत्तीनंतर मिळणारे लाभ कुटुंब निवृत्ती वेतनाची प्रकरणे तातडीने मंजूर करणे. अनुकंपा तत्त्वावरील निवडणुकीचा नेमणुकीचा प्रलंबित प्रकरणांचा विभागाने नियमित आढावा घेऊन सदर प्रकरणे तातडीने मंजूर करणे. संघटना मान्यतेचा प्रस्ताव विभागात सादर करण्यात आलेला असून त्यास मान्यता देणे. सर्व संवर्ग सेवाज्येष्ठता याद्या प्रसिद्ध करून अपर जिल्हाधिकारी निवडश्रेणी, अपर जिल्हाधिकारी ,उपजिल्हाधिकारी निवडश्रेणी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार, नायब तहसीलदार या सर्व संवर्गातील पदोन्नती तातडीने कराव्यात.

# महाराष्ट्र विधान परिषदेत सरकारने शिक्षक मतदार संघाप्रमाणे पत्रकार मतदार संघ निर्माण करावे-असलम कुरेशी

**इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन महाराष्ट्रात सक्रीय होणार-आयेशा खान मुलानी**

**जालना।प्रतिनिधी**
जालना येथील शासकीय विश्रामगृहावर इंडियन जर्नलिस्ट असोसिएशन जालना जिल्हा कमिटीची बैठक संघटनेचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. बैठकित पत्रकारांच्या समस्या, विविध ठिकाणी संघटनेचे विस्तार व आगामी कार्यक्रम या विषयी चर्चा करण्यात आली गया. यावेळी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनचे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष असलम कुरेशी यांनी सांगितले की शासनाने महाराष्ट्र विधान परिषदेत शिक्षक मतदार संघाप्रमाणे पत्रकार मतदार संघ निर्माण करावे. शिक्षक आमदाराप्रमाणे पत्रकारांच्या समस्या सोडविण्यासाठी पत्रकारांचाही आमदार असावा. बैठकीत इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनच्या नवनियुक्त वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष आयेशा खान मुलानी यांनी सांगितले की इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनला सक्रीय करून महाराष्ट्रात मजबूत करून पत्रकारांच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला जाईल. याप्रसंगी आयेशा खान मुलानी (कार्यकारी संपादक आजचा चित्रलेखा) यांची महाराष्ट्र वरिष्ठ प्रदेश उपाध्यक्ष व बालाजी अडियाल (संपादक आजचा चित्रलेखा) यांची प्रदेश सहसचिव पदी नियुक्ती करण्यात आली.



यावेळी इंडियन जर्नलिस्ट असोसिएशनची जालना जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली. यामध्ये आमेर खान (संपादक ज़लज़ला टाईम्स) जिल्हा अध्यक्ष, नरेश अण्णा श्रीपत (न्यूज़ इंडिया वन) जिल्हा महासचिव, जावेद खान (दैनिक लोकतांत्रिक जंग) जिल्हा उपाध्यक्ष, सय्यद महेबुब (दैनिक किंगमेकर टाईम्स) जिल्हा सचिव, शेख सलीम (जालना सिटीझन) जिल्हा उपाध्यक्ष, सुनील भारती (दैनिक प्रबंध भूमि) मिडिया प्रभारी, जावेद तांबोळी (महाराष्ट्र न्यूज) व बासिद बेग (ग्लोबल न्यूज) यांची जिल्हा काउन्सिल सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली.



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शिरापुर धुंमाळ येथे 15 ऑगस्ट। ध्वजारोहण निमित्त शालेयन समितिचे अध्यक्ष श्री गोरक्षनाथ बहिर व उपअध्यक श्री अंबादास गायकवाड मुख्याध्यापक श्री सोनवणे सर उगले सर तांबें सर तसेच तरुण वर्ग मोठ्या प्रामाणात उपस्थित होते

# संपन्न समृद्ध आणि औद्योगिक दृष्ट्या अव्वल बीड जिल्हा घडवू या- धनंजय मुंडे

**दिमाखदार सोहळ्यात ७८ वा स्वातंत्र्यदिन संपन्न**

**बीड, प्रतिनिधी):-**
बीड, दि. 15 येणा-या काळात पायाभूत सुविधांनी समृद्ध कृषीसंपन्न आणि औद्योगिक दृष्ट्या राज्यात अव्वल असा बीड जिल्हा घडवू या, असे आवाहन कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आज केले

येथील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात 78 व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त पालकमंत्री यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा पार पडला त्याप्रसंगी ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, जिल्हा पोलीस अधीक्षक अविनाश बारगळ तसेच जिल्हा परिषद प्रशासक व मुख्य कार्यकारी अधिकारी संगीता डी. पाटील वक्फ बोर्डाचे अध्यक्ष काझी समीर आदींसह सर्व कार्यालय प्रमुख अधिकारी यांची उपस्थिती होती. यावेळी बोलताना पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी लोकाभिमुख योजनांची आखणी आणि अंमलबजावणी राज्यात सुरू आहे. याबद्दल मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उप मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे आभार मानले. राज्यातील प्रत्येक शेतकरी, शेतमजूर, कामगार, कष्टकरी महिला तसेच युवकानं पर्यंत विकासाचा लाभ पोहोचत आहे, असेही ते म्हणाले. यावेळी पुढे बोलताना ते म्हणाले की राज्यातील 2 कोटीहुन अधिक बहिणींना दरमहा 1500 रुपये अर्थसहाय्य मिळवून देणारी 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण' ही महत्वाकांक्षी योजना शासनाने सुरू केली असून पहिल्या 2 महिन्यांचे प्रत्येकी 3 हजार रुपये अर्थसहाय्य थेट या बहिणींच्या खात्यात राखीपौर्णिमेपर्यंत मिळणार आहेत. आपल्या बीड जिल्हयात 3 लाख 45 हजार भगिनी आतापर्यंत पात्र ठरलेल्या आहेत. केंद्र शासनाची उज्वला योजना आणि लाडकी बहिण योजनेच्या लाभार्थी भगिनींना प्रतिवर्षी 3 गॅस सिलेंडर मोफत देण्याची 'मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना' देखील राज्य सरकारने सुरू केली आहे. असेही त्यांनी सांगितले

दि. 1 एप्रिल 2023 नंतर जन्मलेला प्रत्येक मुलीच्या सक्षमीकरणासाठी 'लेक लाडकी योजना' राज्य शासन राबवित आहे. या अंतर्गत आपल्या जिल्ह्यात 873 लाभार्थीना 43 लाख 75 हजार रुपये इतका लाभ शासनाने दिला असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. गेल्या वर्षी खरिप हंगामापासून 1 रुपयात पीक विमा योजना सुरु करण्यात आली. बीड जिल्ह्यात 2023-2024 च्या खरीप व रब्बी हंगामात मिळून 400 कोटी 24 लाख रुपये पीकविमा मंजूर करण्यात आला असून यापैकी आतापर्यंत सुमारे 379 कोटी रुपयांचे वितरण शेतकऱ्यांना करण्यात आले असून, उर्वरित 21 कोटी रुपये वितरित करणे सुरू आहे. याशिवाय विमा कंपनीने कोणतेही कारण न देता नाकारलेले विमा प्रस्ताव मंजूर करून त्याही शेतकऱ्यांना येत्या काही दिवसात पीकविमा मिळणार आहे. चालू हंगामात खरिप पिकासाठी 17 लाख 14 हजार विमा अर्ज सादर करून लाखो शेतकऱ्यांनी याही वर्षी एक रुपयात पीकविमा योजनेत सहभाग घेतला आहे.असे सांगून पालकमंत्री श्री मुंडे म्हणाले की वेळोवेळी होणारी अतिवृष्टी, वादळ वारा, दुष्काळ या नैसर्गिक आपत्तींच्या भरपाईपोटी गेल्या 2 वर्षात 7 लाख 21 हजार 607 शेतक-यांना 593 कोटींहून अधिक रकमेची भरपाई थेट त्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे.

थेट लाभाच्या योजना शेतकरी वर्गाचे उत्पन्न वाढावे यासाठी थेट लाभाच्या प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेसोबतच राज्य सरकारने नमो शेतकरी महासन्मान योजना सुरु केली आहे. या योजने अंतर्गत चालू आर्थिक वर्षात जिल्हयातील 3 लाख 89 हजार शेतक-यांना 108 कोटी 14 लाख रुपयांचा लाभ शासनाने दिला असून थेट लाभाचाच एक भाग म्हणून शेतीतील वीज बिलात सवलत म्हणून मुख्यमंत्री बळीराजा वीज सवलत योजना सरकारने जाहीर केली आहे. या योजनेमुळे 7.5(साडेसात) एच पी पर्यंतच्या कृषीपंप वापरणाऱ्या शेतकऱ्यांना मोफत वीज मिळणार आहे. त्यामुळे उत्पादन खर्च कमी करण्यास निश्चितच मदत होणार आहे. 2029 पर्यंत ही योजना राबवली जाणार आहे असे पालकमंत्री यावेळी म्हणाले.

यंदा चांगल्या पावसाच्या पार्श्वभूमीवर शेतकऱ्यांना उत्पादन वाढीची संधी आहे याच भूमिकेतून जिल्ह्यात या खरिप हंगामात 3 पट अधिक खताची उपलब्धता करून देण्यात आली अस सांगून श्री मुंडे म्हणाले की दिवसेंदिवस यांत्रिकीकरण वाढत आहे यांचा लाभ शेतक-यांना मिळावा यासाठी जिल्हयातील 398 शेतक-यांना 2 कोटींहून अधिक रकमेच्या कृषी यांत्रिकी साहित्याचे वाटप करण्यात आले आहे.

सेंद्रीय शेतीचेही महत्व लक्षात घेऊन केंद्र शासनाच्या परंपरागत कृषी विभाग कार्यक्रमात आपला जिल्हा राज्यात पहिल्या क्रमांकावर असून सध्या एक हजार हेक्टर क्षेत्र सेंद्रीय शेतीखाली आणण्याचे काम सुरु आहे. तसेच राज्य शासनाच्या डॉ. पंजाबराव देशमुख नैसर्गिक शेती मिशन अंतर्गत येत्या 3 वर्षात 21 हजार हेक्टर क्षेत्र नैसर्गिक शेतीखाली आणले जाणार आहे. कृषी व पशु प्रर्दशनी जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी संदर्भातील नवे तंत्रज्ञान आणि यंत्र सामुग्री, नवनवीन शोध, शेतीतील आधुनिक व शास्त्रोक्त माहिती मिळावी तसेच नवनवीन उपकरणे, इत्यादी खरेदी करणे शक्य व्हावे सोबतच पशु पालनातील नवे तंत्र व उपलब्धता यासाठी येत्या 21 ऑगस्टपासून परळी येथे भव्य असे राज्यस्तरीय 5 दिवसीय कृषी व पशु पालन प्रर्दशन आयोजित करण्यात येत आहे. याचा लाभ जिल्ह्यातील प्रत्येक शेतकरी व शेतीशी संबंधित प्रत्येक व्यक्तीने घ्यावा, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सध्या राज्यात महसूल पंधरवडा सुरु आहे. यानिमित्ताने महसूल विभागाच्या माध्यमातून आपले काम चोखपणे पार पाडणाऱ्या सर्व अधिकारी-कर्मचाऱ्यांचे मी मनापासून अभिनंदन करतो. महसूल विभागाकडून करण्यात येणारी ई-पीक पाहणी महत्वाची आहे. यात ग्रामीण भागातील सर्वांनी सहकार्य करावे असे आवाहन मी करतो.असे सांगून पालकमंत्री श्री मुंडे आपल्या भाषणात पुढे म्हणाले की,नुकतेच कृषी विभागाने मागील वर्षी सोयाबीन



व कापसाचे भाव पडल्याने नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना दोन हेक्टरच्या मर्यादेत हेक्टरी 5 हजार रुपये अनुदान देण्याचे जाहीर केले आहे. यासाठी कृषी विभागाने निधी उपलब्ध करून दिला असून, ई-पीक पेऱ्याची नोंद असणारे सर्व सोयाबीन-कापूस उत्पादक शेतकरी यासाठी पात्र आहेत. या अनुदानाचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकरी बांधवांनी आपल्या गावाच्या कृषी सहाय्यकांकडे संमतीपत्र किंवा सामूहिक नाहरकत देणे गरजेचे आहे. कृषी सहाय्यक बांधवांना देखील उद्यापासून या कामासाठी आपापल्या गावांमध्ये पूर्णवेळ उपस्थित राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यातील महसूल यंत्रणा मजबूत व्हावी यासाठी तलाठी भरती 2023 अंतर्गत 193 पदांची भरती करण्यात येत आहे यातील 140 जणांना आतापर्यंत नियुक्ती देण्यात आली आहे. यामुळे जनतेची कामे गतिमान पद्धतीने होतील असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

ज्यांचे शिक्षण झाले आहे आणि आता हातात काम नाही अशा युवकांना मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेअंतर्गत कामाचे प्रशिक्षण देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. यातून रोजगार संधीसह कुशल युवाशक्ती आणि जिल्ह्यात रोजगार वाढणार आहे असे सांगून त्यांनी जिल्ह्यात गतिमान पद्धतीने विकास व्हावा यासाठी जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून कामे केली जात आहेत. यंदाचा जिल्ह्याचा आराखडा 484 कोटी रुपयांचा आहे. यातील सर्व कामे वेळेवर पूर्ण होतील यासाठी सर्वांचे योगदान महत्त्वाचे राहणार आहे.अशीही माहिती यावेळी दिली.

जिल्ह्यात पत्र्याच्या शेडमध्ये भरणा-या 98 शाळांपैकी आतापर्यंत नियोजन समितीतून 25 शाळांना बांधकामासाठी निधीची तरतूद मंजूर करण्यात आली आहे. उर्वरित शाळांना येत्या काळात निधी देऊन सर्व शाळा पक्क्या बांधकामात रूपांतरित केल्या जाणार आहेत.जिल्हा नियोजन निधीचा वापर कायदा व सुव्यवस्थेसाठी व्हावा यासाठी सी.सी.टीव्ही यंत्रणा उभारण्यात आली आहे. बीडसह परळी, माजलगाव येथे 12 कोटी 95 लाख निधी खर्च करून 426 ठिकाणी आधुनिक पद्धतीची सीसीटीव्ही यंत्रणा उभारली आहे. यामुळे जिल्ह्यातील गुन्हेगारी कमी होण्यास मदत होत आहे. जिल्ह्यातील उर्वरित तालुक्यात देखील सीसीटीव्ही यंत्रणा बसविने प्रस्तावित आहे. असेही श्री मुंडे यांनी सांगितले.

लोकनेते स्व. गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार महामंडळाच्या अंतर्गत संत भगवानबाबा शासकीय वसतिगृह उभारणी तसेच बीड येथील जिल्हाधिकारी कार्यालय आणि प्रशासकीय भवन बांधकाम, अद्ययावत कृषी भवन, कृषी महाविद्यालय, जिल्ह्यातील प्रमुख राष्ट्रीय व राज्य महामार्गाचे काम यांच्या रूपाने जमिनीवर दिसणारा विकास आकारास येत आहे. या सर्वांमुळे जिल्ह्याचा चेहरामोहरा बदलणार आहे. असा विश्वास त्यांनी व्यकत केला.परळी येथील वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकासाच्या सोबतीने जिल्ह्यातील इतर ऐतिहासिक किल्ले व तीर्थक्षेत्रांचा विकास याकडे सरकारचे लक्ष असून या सर्वांचा विकास करण्याची कामे हाती घेण्यात आली आहेत. असेही श्री मुंडे यावेळी म्हणाले.

नुकत्याच झालेल्या ऑलिम्पिक स्पर्धेत जिल्हयातील खेळाडू व सैन्य दलातील जवान अविनाश मुकुंदराव साबळे यांच्या यशाचे कौतुक केले त्याचा जिल्हयालाच नव्हे तर देशाला अभिमान आहे असे ते म्हणाले.

# रोहितळ राजमाता जिजाऊ विद्यालयात यशराज पंडित यांच्या हस्ते ध्वजारोहण

## शिक्षण घेऊन आई-वडिलांचे स्वप्न पूर्ण करा-यशराज पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

शोभादेवी महिला सेवाभावी संस्था संचलित राजमाता जिजाऊ विद्यालय रोहितळ या शाळेत स्वातंत्र्यदिनी युवा नेते यशराज पंडित यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

15 ऑगस्ट या स्वातंत्र्यदिनी राजमाता जिजाऊ विद्यालय रोहितळ शाळेत यशराज पंडित यांच्या प्रमुख उपस्थितीत सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. याप्रसंगी शिवसेना उपजिल्हाप्रमुख बबलू खराडे, युवा सेना तालुकाप्रमुख शेख शहेदाद, सरपंच मुकुंद बाबर, उपसरपंच अनिल माळी, पप्पू चव्हाण, माजी उपसरपंच पंडित गायकवाड, ग्रा पं सदस्य दामु



जीजा गोरे, श्रीहरी गोरे, विठ्ठल शिंदे, बाळासाहेब वाघमोडे, बाबासाहेब शिंदे, अमोल खरात, शाकीर शेख, भागवत पवार, किशोर ठोंबरे, ज्ञानेश्वर खरात, रमेश गायकवाड, परमेश्वर बाबर, विनोद गायकवाड, उज्वल सुतार, ओम माळवदे ज्ञानेश्वर राऊत भागवत गायकवाड, राजेंद्र ठोंबरे, आदींसह ग्रामस्थांची उपस्थिती होती.

विद्यार्थी व पालकांशी संवाद साधताना युवा नेते यशराज पंडित म्हणाले की ग्रामीण भागातील मुला मुलींना शिक्षणाची सोय व्हावी यासाठी माजी राज्यमंत्री बदामराव आबा पंडित यांनी ग्रामीण भागात राजमाता जिजाऊ आणि अहिल्याबाई होळकर या नावाने शाळा सुरू केले आहेत. यामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची सोय आपल्याच गावात झालेली आहे. याचा फायदा घेऊन मुला-मुलींनी उच्च शिक्षण घ्यावे आणि आपल्या आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करावे. नोकरी सोबतच व्यावसायिक शिक्षण घेऊन वेगवेगळ्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्रांमध्येही आपले नाव कमवावे असे आवाहन करून यशराज पंडित यांनी शालेय विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे कौतुक केले. शाळेत शिक्षणासह क्रीडा स्पर्धा प्रबोधनात्मक उपक्रम आणि सांस्कृतिक कार्यक्रम घेऊन विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी सर्व शिक्षकांनी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक गणित अध्यापक मंडळाचे तालुकाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी केले तर सरपंच मुकुंद बाबर, मुख्याध्यापक राजाभाऊ क्षीरसागर यांची समायोजित भाषणे झाली. सूत्रसंचालन गोविंद राऊत यांनी तर वसंत केदार यांनी आभार मानले.

दरम्यान बालाजी शिंदे, वसंत केदार व संगीता खराडे मॅडम यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय विद्यार्थ्यांनी विविध राष्ट्रपुरुष, आदर्श महिला व्यक्तिमत्व तसेच डॉक्टर, वकील, शास्त्रज्ञ आदींच्या वेशभूषा करून सवाद्य लेझीम पथकासह गावातून प्रभात फेरी काढली. यात केशरी साड्या आणि भगवे फेटे परिधान केलेल्या विद्यार्थिनींनी गावकऱ्यांचे लक्ष वेधले.

शाळेचे शिक्षक रेवननाथ वराट, आदिनाथ अर्सुळ, रेवन भोईटे, विठ्ठल चाळक, गव्हाणे मामा आदींसह विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संत ज्ञानेश्वर विद्यालय आपेगाव येथे ७८ वा स्वातंत्र्य दिन साजरा

## एस.एस.सी. २०२४ मध्ये प्रथम आलेल्या विद्यार्थिनीच्या हस्ते ध्वजारोहण



**पैठण । चैताली औटी**

संत ज्ञानेश्वर विद्यालयामध्ये ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. दरवर्षी एस.एस.सी. परीक्षेत विद्यालयातुन प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्याच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात येते.या वर्षी एस.एस.सी. परिक्षा मार्च २०२४ मध्ये विद्यालयातून प्रथम आलेली कु. गायत्री राम औटे हिच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून गावचे सरपंच पांडुरंग औटे, उपसरपंच, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष माऊली पाटील मुळे, पोलीस पाटील,डॉ. आरले, उपस्थित होते.

विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणाच्या माध्यमातून आजादी का आमृत महोत्सव, स्वतंत्र भारत देशाविषयी विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते व भाषणाच्या माध्यमातून आपले मनोगत व्यक्त केले.दहावी मध्ये प्रथम येणाऱ्यास सरपंच पांडुरंग दादा औटे यांच्या तर्फे पाच हजार एक रुपयाचे बक्षीसही देण्यात आले. यावेळी अनेक पालकांनी संत ज्ञानेश्वर विद्यालया बाबत बोलताना असे म्हटले की, संत ज्ञानेश्वर विद्यालय हे पैठण तालुक्यामध्ये सर्वोत्कृष्ट असे विद्यालय आहे असे म्हणुन विशेष कौतुक देखील केले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक कु .श्रद्धा औटे व प्रांजली मोरे यांनी केले.यावेळी मुख्याध्यापक कल्याण म्हस्के, शाळेतील सहशिक्षक श्री नवथर कांतीलाल, काकासाहेब लिपाणे, विवेक भोसले ,प्रवीण पोकळे ,संभाजी चिरखे, प्रकाश पाटील ,संजय वल्ले, श्रीमती घनवट मॅडम ,महेश वैद्य, सतीश आंधळे दीपक लसगरे, गंगाधर शिंदे, ज्ञानेश्वर गायके व शिक्षकेतर कर्मचारी श्री राम एरंडे ,दादा सोनवणे, काका आहेर, रामनाथ पालकर आदी उपस्थित होते.

# शिक्षणाचा अधिकार : एक मुलभत अधिकार–प्रा.शशिकांत जावळे




शिरूर कासार ।प्रतिनिधीअनु.जाती व नवबौद्ध (मुलांची) शासकीय निवासी शाळा शिरुर कासार येथे संविधान : “शिक्षण व आरक्षण “ या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. प्रमुख व्याख्याते म्हणून प्रा. शशिकांत जावळे यांना आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान प्राचार्या श्रीमती अस्मिता जावळे मॅडम यांनी भूषविले. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन अंतर्गत भारतीय स्वातंत्र महोत्सव निमित्त संविधान मंच स्थापन करण्यात आलेला आहे त्या अनुषंगाने शासकीय निवास मुलांची शाळा येथे सदर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते कार्यक्रमाची सुरुवात डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची प्रतिमा व भारतीय संविधान यांचे पूजन करून करण्यात आली .भारतीय संविधानामध्ये शिक्षण व आरक्षण तरतूद डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना का आवश्यकता वाटली , त्याबद्दलचे विश्लेषण उदाहरणांसह प्रा. शशिकांत जावळे यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांना संविधानाची ओळख असणे गरजेचे आहे असे विशद केले पुढे बोलताना त्यांनी विद्यार्थ्यांना आरक्षणाविषयी असणारा संभ्रम विविध उदाहरणे देऊन दूर केला. विद्यार्थ्यांनी शिक्षण घेत असताना उच्च शिक्षण व परदेशात जागतिक दर्जाचे शिक्षण घेतले पाहिजे यासाठी इंग्रजी विषया वर आपले प्रभुत्व असले पाहिजे. कारण जागतिक स्तरावर इंग्रजी भाषेला मान्यता आहे. कार्यक्रमाच्या अध्यक्षीय समरूप मध्ये प्राचार्य श्रीमती अस्मिता मॅडम यांनी विद्यार्थ्यांनी मौक्याच्या वनाच्या जागा काबीज करावी त्यासाठी त्यांना भारत सरकार सामाजिक न्याय विभागाच्या विविध असणाऱ्या योजनांची माहिती विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री सुनील फंद सर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री वाघमारे सर यांनी मानले . या कार्यक्रमासाठी विचार मंचावर श्री जगताप सर , श्री सिरसाट सर आदी उपस्थित होते . या कार्यक्रमासाठी विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

# बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीमध्ये भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात



**बीड । प्रतिनिधी**

बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीमध्ये भारतीय स्वातत्र्यं दिन उत्साहात साजरा करण्यात आला बीड कृषी उत्तपन्न बाजार समितीच्या सभापती सौ.सरलाताई कामराज मुळे पाटील यांच्या शुभहस्ते ध्वजारोहन करण्यात आले यावेळी उपसभापती श्यामभाऊ पडोळे,संचालक दिपक काळे,बळीराम चव्हाण,पंडित माने,पी वाय जोगदंड,सचिन फड,राधेश्यामजी कासट,शेतकरी पुत्र धनंजय गुंदेकर,वैभव मुळे पाटील,कृषी उत्तपन्न बाजार समितीचे सचिव यशवंत कदम साहेब व सर्व व्यापारी व मापाडी कर्मचारी वृंद मोठया संख्येने उपस्थीत होते.

# पालकमंत्री धनंजय मुंडे यांना काळा झेंडा दाखवून माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी निषेध नोंदवला

**बीड । प्रतिनिधी**

माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी पालकमंत्री तथा कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी स्वातंत्र्यदिनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर केला काळा झेंडा दाखवून निषेध नोंदवला आहे तीन वेळा प्रत्यक्ष भेट घेऊन मागणीचे निवेदन देऊन आपल्याकडून काम होत नाही. याचा तीव्र निषेध व रोश व्यक्त केला.

एक वर्षापासून माजी सैनिक प्रकाश वाघमारे हे शिवनी येथील गट नंबर 662 येथे बेमुदत धरणे आंदोलन करत आहेत. पोलीस व आरोपी यांनी संगणमताने शेतातील घर शेड पाडले,अँगल कट केले, त्याची चोरी ही केली मात्र या



प्रकरणी पिंपळनेर पोलिसांनी गुन्हा नोंद केला नाही, या सर्व घटनेचे पुरावे वाघमारे यांच्याकडे व्हिडिओ स्वरूपात आहेत पोलीस प्रशासन हे अपराध्यांना पाठीशी घालत आहे.१५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिन माजी सैनिक प्रकाश वाघमारे यांनी पालकमंत्री तथा कृषीमंत्री याचे आज जिल्हाधिकारी उपोषणाला बसलेल्या लोकांची भेट घेत पुढे आले त्यावेळी भेट देते प्रसंगी खिशातील काळा झेंडा फडकवत निषेध केला. त्यांच्या सोबतच्या सुरक्षारक्षकांनी तो ताब्यात घेतला. यावेळी पालकमंत्री तथा कृषी मंत्री धनंजय मुंडे यांची चांगलीच पाच वर धारण बसली. जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात या बेमुदत धरणे आंदोलनाची चर्चा होत आहे.

# आर्यवैश्य महासभेच्या जिल्हाध्यक्षपदी सूर्यकांत महाजन तर सचिवपदी अजय रुद्रवार



**केज/सचिन भालेराव**

महाराष्ट्र आर्यवैश्य महासभेच्या बीड जिल्हाध्यक्षपदी क्रियाशील व्यक्तिमत्वाचे सूर्यकांत महाजन यांची तर सचिवपदी अजय रुद्रवार यांची तर कार्याध्यक्षपदी वैभव झरकर व कोषाध्यक्षपदी बालाजी बासटवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली

बीड जिल्ह्याच्या विद्यमान कार्यकारिणीची कालावधी संपल्यामुळे मागील तीनवर्षांच्या ताळेबंदाला मान्यता देण्यासाठी सचिव वैभव झरकर यांनी बैठकीची सूचना काढली होती व याच बैठकीत नवीन कार्यकारिणीच्या निवड व्हावी याकरिता महासभेकडून समन्वयकांची नियुक्ती करण्यात आली होती. नियुक्त समितीतील अभय कोकड , विकास डुबे व अनिल चिद्रवार , संजीवजी डुबे , नागनाथ पारसेवार , अजित भावठणकर यांनी त्यांना निवड प्रक्रियेसाठी मिळालेल्या प्राप्त निर्देशानुसार इच्छुकांचे अर्ज मागवले त्यानुसार निहित वेळेत प्राप्त झालेल्या अर्जांना अनुसरून माजलगाव येथे महासभेच्या सर्व जिल्हा सदस्यांची बैठक घेण्यात आली त्याठिकाणी प्राप्त अर्जंवर विचार व खुली चर्चा होऊन अनेकांनी आपले अर्ज वापस घेतल्याने प्रत्येक पदासाठी एकच अर्ज राहिला होता तसेच या बैठकीच्या अजेंड्यानुसार मावळते अध्यक्ष सुमित रुद्रवार , सचिव वैभव झरकर व कोषाध्यक्ष अभय भावठणकर यांनी तीन वर्षांचा ताळेबंदासह धारूर येथे झालेल्या कुटुंब मेळाव्याचा ताळेबंद सर्वांना सादर केला व त्यास सर्वसंमतीने मान्यता देण्यात आली

माजलगाव येथे सर्व प्रक्रिया पार पडल्यानंतर सोमवार दि 12 ऑगस्ट रोजी परळी येथे महासभेचे राष्ट्रीय अध्यक्ष नंदकुमार गादेवार यांनी बीड जिल्ह्याच्या जिल्हाध्यक्षपदी महासभेचे जेष्ठ सदस्य असलेले बीड येथील सूर्यकांत महाजन यांची तर सचिवपदी माजलगाव येथील प्रतिष्ठित सराफ व्यापारी अजय रुद्रवार यांची तर कार्याध्यक्षपदी माजी सचिव असलेले परळी येथील वैभव झरकर यांची तर कोषाध्यक्षपदी अंबाजोगाई येथील बालाजी बासटवार यांची बिनविरोध निवड करण्यात आली उर्वरित कार्यकारिणीच्या निवडीसाठी नवनियुक्त कार्यकारिणीला जिल्ह्याचा दौरा करून लवकरात लवकर निवडी करण्याच्या सूचना यावेळी

देण्यात आल्या यावेळी महासभेचे सर्व सदस्यांची उपस्थिती होती.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
# लोकआरंभ
शनिवार १७ ऑगस्ट २०२४ पान क्रं - ४ PAGE NO 4

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# मला मिळालेले तीन हजार तीन लाखासारखे मुख्यमंत्री सरनाही तर भाऊ असा आवाज देणार...

## मुख्यमंत्र्यांची बहीण म्हणून कुटुंबात आता माझी नव्याने ओळख... मुख्यमंत्री भावाशी राज्यातील लाडक्या बहिणींचा मनमोकळा संवाद

### बहिणींना रक्षाबंधनापूर्वी ओवाळणी जमा झाल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी व्यक्त

**मुंबई । प्रतिनिधी**

मुंबई, दि. 15: 'मी आता तुम्हाला मुख्यमंत्री सर म्हणणार नाही तर भाऊ म्हणेन..', 'घरखर्चासाठी आता नवऱ्याकडे रोज हात पसरणार नाही.. सख्खा भाऊ मला विचारत नाही..पण मुख्यमंत्री साहेब माझ्या पाठीशी सख्ख्या भावाप्रमाणे उभे राहीले', 'मला मिळालेल्या तीन हजाराची किंमत ही तीन लाखा एवढी आहे..', 'माझ्या अपेक्षेपेक्षा जास्त लवकर पैसे माझ्या खात्यात जमा झाले. रक्षाबंधनापूर्वी मला ओवाळणी मिळाली...!' राज्यभरातील भगिनींनी आपल्या मुख्यमंत्री भावाकडे व्यक्त केलेल्या या भावना आहेत. या भावनांनी मुख्यमंत्रीही हेलावले आणि तुमच्या लाखो भगिनींचं आशीर्वादाचं बळ माझ्या पाठिशी आहे.. अशा शब्दांत त्यांनीही भगिनींच्या प्रेमाचा स्वीकार केला. कालपासून (दि. १४ ऑगस्ट) मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या दोन हप्त्यांची एकत्रित रक्कम (तीन हजार रुपये) भगिनींच्या खात्यात जमा होण्यास सुरूवात झाली आहे. आजपर्यंत सुमारे ८० लाख भगिनींच्या खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये जमा झाले असून आज या लाभार्थ्यांशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी प्रातिनिधीक स्वरूपात संवाद साधला. त्यावेळी लाभार्थी भगिनींनी आपल्या भावना व्यक्त करताना, मी आता मुख्यमंत्र्यांची बहीण आहे.. अशी नवीन ओळख निर्माण झाल्याचे सांगत मनमोकळेपणाने आपल्या मुख्यमंत्री भावाशी संवाद साधला.

राज्यभरातील भगिनींच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून समाधान वाटल्याचे सांगत ही योजना केवळ निवडणुकीपुरती नाही ती कायम आहे. योजनेकरिता या आर्थिक वर्षासाठी पूर्णपणे तरतुद करण्यात आली असून तुम्हाला योजनेचा लाभ मिळत राहील, अशी ग्वाही मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांनी आपल्या राज्यभरातील बहिणींना दिली. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेचे पैसे भगिनींच्या बँक खात्यात जमा झाल्याचा आनंद होत असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, भावाने बहिणीला दिलेला हा माहेरचा आहेर आहे. तुमचा भाऊ आज मुख्यमंत्री आहे. तो खंबीरपणे तुमच्या पाठिशी आहे. लाडक्या बहिणींना दिलेली ही मदत फक्त त्यांच्या पुरती मर्यादीत नाही तर त्यांच्या कुटुंबासाठीही मोलाची अशी ही भेट आहे. यामुळे तुम्हाला कोणाकडे हात पसरावा लागणार नाही. मुलांच्या शालेय साहित्यासाठी, तुमच्या औषधांसाठी, तसेच तुमचा सुरु असेलेला छोटा, मोठा व्यवसाय वाढवण्यासाठी या पैशांचा तुम्हाला उपयोग होणार आहे. घर कसे सांभाळावे हे महिलांना चांगले ठाऊक असते. त्यामुळे या योजनेच्या माध्यमातून त्यांच्या हाताला बळ देण्याचे काम शासनाने केले आहे. या योजनेच्या माध्यमातून तुम्ही व्यवसाय वाढवालच त्यामुळे अर्थव्यवस्थेलाही बळ मिळणार आहे. त्यातून तुम्ही नोकरी देणारे व्हा. त्यामुळे रोजगाराच्या अनेक संधी निर्माण होतील. महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासन कटीबद्ध आहे. महिलांसाठी शासनाने 108 योजना सुरु केल्या आहेत. या सर्व योजनांची माहिती घेऊन त्याचा लाभ बहिणींनी घ्यावा असे आवाहनही मुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी यावेळी केले.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आज या योजनेच्या माध्यमातून बहिणींसोबत एक जिव्हाळ्याचे नाते



निर्माण झाले आहे. सर्वसामान्य, दुर्बल, गरीब, शेतकरी, ज्येष्ठ नागरिक, युवक - युवती, कामगार यांच्यासाठी सरकार शक्य ते सर्व करत आहे. या सर्वांसाठी राबवण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ लाभार्थ्यांना मिळाला की केलेल्या कामाचे सार्थक झाले असे वाटते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी उमेदच्या माध्यमातून बचतगट सक्षम करण्याचे काम सरकार करत आहे. पुर्वी बचत गटांसाठी असलेली कर्ज मर्यादा वाढवून 20 लाख रुपयांपर्यंत वाढवली आहे. आता त्यामध्ये 50 लाख रुपयांपर्यंत वाढ करण्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे. शिक्षणापासून मुली वंचित राहू नयेत, शैक्षणिक फीसाठी त्यांचे शिक्षण अर्धवट राहू नये यासाठी मुलींना शिक्षणामध्ये 100 टक्के फी माफ करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे.

मुख्यमंत्री श्री. शिंदे पुढे म्हणाले, युवक – युवतींच्या हाताला काम मिळावे यासाठी मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना राबवण्यात येत आहे. या योजनेच्या माध्यमातून राज्यात कुशल मनुष्यबळ निर्माण करण्यात येत आहे. याचा फायदा उद्योगांनाही होणार आहे. राज्यात सध्या मोठ्या प्रमाणावर उद्योग उभारले जात आहेत. त्या उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध होणार आहे. महिलांना एसटी प्रवासात 50 टक्के सवलत दिली आहे. त्यामुळे एसटी फायद्यातच आली आहे. याशिवाय वारकऱ्यांना शासन मदत करत आहे. ज्येष्ठ नागरिकांसाठी वयोश्री योजना, मुख्यमंत्री अन्नपुर्णा योजना, मुख्यमंत्री तिर्थदर्शन योजना अशा अनेक लोककल्याणकारी योजना राबवण्यात येत आहेत. फक्त रस्ते, पुल बांधणे, दळण वळण उभारणे महत्वाचे नाही तर लोककल्याणकारी योजना राबवणेही महत्वाचे आहे. यासाठी शासन कटीबद्ध असून राज्यातील प्रत्येक घटकासाठी शासन योजना राबवत आहे.

शेतकऱ्यांचे कृषी पंपाचे वीज बील माफ करण्यात आले आहे. 45 लाख कृषी पंप धारकांना याचा लाभ झाला आहे. तसेच नमो सन्मान योजनेमध्ये केंद्राच्या 6 हजार रुपयांव्यतिरिक्त राज्य शासनाचे 6 हजार रुपये आणखी भर घालून आता 12 हजार रुपये शेतकऱ्यांना देण्यात येत आहेत. एखादी योजना सुरु करणे सोपे काम नाही. तसेच ती एका दिवसातही तयार होत नाही. लाडकी बहीण योजना तयार करण्याचे काम 1 वर्षापासून सुरु होते. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच महिला व बाल कल्याण मंत्री अदिती तटकरे यांच्यासह सर्व विभागांचे अपर मुख्य सचिव, सचिव यांच्या परिश्रमामुळे ही योजना यशस्वी झाली आहे. गडचिरोली सारख्या जिल्ह्यापर्यंत योजना पोहचवल्याबद्दल सर्व अधिकारी वर्गाचे मी अभिनंदन करतो.

महिलांना सक्षम व आत्मनिर्भर बनवणे हा शासनाचा उद्देश आहे. त्यासाठी शासन व प्रशासन अहोरात्र काम करत असल्याचेही मुख्यमंत्री श्री. शिंदे यावेळी म्हणाले.

यावेळी महिला व बाल कल्याण विभागाचे सचिव अनुपकुमार यादव यांच्यासह राज्यातील सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी आणि लाभार्थी महिला दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होत्या.

00000

## स्वातंत्र्यदिनी पोलीस उपनिरीक्षक सागर झाडे सन्मानित



**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड-किनवट : किनवट पोलीस स्टेशन येथील कार्यरत पोलीस उपनिरीक्षक सागर सुभाषराव झाडे यांना नक्षलग्रस्त भागात उत्कृष्ट कर्तव्य बजावल्याबद्दल नांदेड येथे स्वातंत्र्याच्या ७७ व्या वर्धापनदिनी जिल्हाधिकारी अभिजीत राऊत यांच्या हस्ते विशेष सेवा पदक प्रदान करण्यात आले. पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य यांनी नक्षलग्रस्त भागात उत्कृष्ट कर्तव्य बजावलेल्या पोलीस अधिकारी कर्मचारी यांना विशेष सेवा पदक जाहिर केले.याबाबत पोलीस उप निरीक्षक सागर सुभाषराव झाडे यांना जिल्हाधिकारी अभिजीत राऊत नांदेड परिक्षेत्राचे उपमहानिरीक्षक शहाजी उमाप पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार यांच्या हस्ते सेवा पदक पुरस्कार प्रदान करण्यात आला. उत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कार मिळाल्याबद्दल किनवट पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला यांच्यासह किनवट पोलीस स्टेशनचे अधिकारी कर्मचारी यांनी पोलीस उपनिरीक्षक सागर झाडे यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

## श्याम पाटील वडजे यांनी घेतली मनोज जरांगे पाटील यांची भेट

**नांदेड प्रतिनिधी : बालाजी सिरसाट**

नांदेड : मराठा समाजाला ओबीसी प्रवर्गातून आरक्षण मिळावं या मागणीसाठी संघर्ष करत असलेले मराठा योद्धा मनोज जरांगे पाटील यांची नांदेड येथील मराठा समाज बांधवांनी अंतरवाली सराटी येथे भेट घेऊन जिल्ह्यातील मराठा आरक्षणासाठी झालेल्या समाज बांधवांच्या आत्महत्या याविषयी शासन स्तरावर चालू असलेला पाठपुरावा या संदर्भात सविस्तर चर्चा केली.

मराठायोद्धा मनोज जरांगे पाटील हे पश्चिम महाराष्ट्र दौरा अतिशय यशस्वी रित्या पार पाडल्या बद्दल त्यांचे अभिनंदन करीत, तब्बेतीची काळजी




घेण्याची विनंती ही केली.नांदेड जिल्ह्यातील मराठा आरक्षणासाठी झालेल्या २४ आत्महत्या पैकी आत्तापर्यंत ९ परिवाराला शासकीय मदत आणि २ कुटुंबातील सदस्याला शासकीय नौकरी आपल्या सततच्या पाठपुराव्या मुळे आपण मिळवून दिली आणि अजुन १२ कुटुंबाचा प्रस्ताव शासनाकडे पाठवला आणि ३ प्रकरणे अजुनही प्रलंबित आहेत, आपण त्यात वेळातला वेळ काढुन लक्ष घालावे व पीडित कुटुंबाला आधार द्यावा अशी विनंती ही यावेळी जरांगे पाटील यांच्या कडे करण्यात आली. यावेळी श्याम पाटील वडजे, डॉ दत्ता मोरे याच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

## चाकरवाडी हे अन्नदानाचे वैंभव आहे भगवान महाराज शास्त्री यांचे प्रतिपादन..

बीड प्रतिनिधी - संतांनी सांगितलेल्या मार्गाने चालतं रहा कुठे ही तुम्हाला अडचण होणार नाही.संताच्या संगती मुळे अनेक जन आदर्श होतात. संतावर विश्वास का ठेवावा संत सगळ्यांचं भल करत असतात. संतांची दया ही सर्वांवर असते. मानव कितीही चालला तरी तो पोहचत नाही जो पोहचतो तो खुप भाग्यवान आहे आणि माऊली दादा पोहचलेले होतें दादा खूप भाग्यवान होते. त्यासाठी दादांची सेवा करावी. दादा खूप मोठे महात्मे होते पण दादा कोणाला कळाले नाहीत. दादा विषयी महाराजांनी आपल्या



अभंगाच्या माध्यमातून दादांच्या आठवणींना उजाळा दिला. दादांच्या आठवणी सांगताना भाविक भक्तांना अश्रु अनावर झाले होते. परमार्थ गोड होण्यासाठी गोड जगले पहिजे. विसाव्या शतकातील महान संत विभुती वै. ह. भ. प ज्ञानेश्वर माऊली महाराज श्री क्षेत्र चाकरवाडीकर यांच्या कृपा आशिर्वादाने आणि ह भ प गुरुवर्य तपोनिधी शांतीब्रह महादेव महाराज तात्या यांच्या मार्गदर्शनाखाली चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह व गुरूवर्य तपोनिधी बाळनाथ महाराज पालखी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहाची सुरुवात 12 ऑगस्ट 2024 या दिवशी झाली आणि सांगता 19 ऑगस्ट 2024 रोजी होणार आहे. यादरम्यान 15 ऑगस्ट 2024 चतुर्थ दिवसाची कीर्तन सेवेमध्ये भगवान महाराज शास्त्री वरपगावकर कर बोलत होते. ह भ प भगवान महाराज शास्त्री यांनी निळोबाराय यांच्या अभंगावर चिंतन केले. मार्ग दाउनी गेले आधीं । दयानिधी संत पुढें ॥१॥ तेणेंचि पंथें चालोंजातां । न पडे गुंता कोठें कांहीं ॥२॥ मोडूनियां नाना मतें । देती सिध्दांते सौरसु ॥३॥ निळा म्हणे ऐसे संत । कृपावंत सुखसिंधु ॥४॥ दादांना माऊली हा शब्द आहे माऊली म्हणजे आई होय. दादा दिसताना मनुष्य दिसत होते पण ते देव होते, माऊली दादांनी हजारोंचे जिवन कृतार्थ केलें. महात्मा कोणाला म्हणावे, दादा परमार्थ जगले आणि ते लोकांना सांगीतले दादा जगाचे वडील आहे. दादा खूप मोठे संत होते. यावेळी मृदंगाचार्य अमोल महाराज पवार चाकरवाडीकर, अविष्कार महाराज क्षीरसागर, राधाकृष्ण महाराज माखले, महादेव महाराज रोडे, ह. भ. प हनुमान महाराज घोलप, ह. भ. प प्रशांत महाराज क्षीरसागर , गणेश महाराज भोसले, अनिकेत महाराज आविष्कार महाराज क्षिरसागर तसेच महाराज मंडळी मोठया संख्येने उपस्थित होते. तसेच यावेळी नानासाहेब काकडे पोलिस पाटील चाकरवाडी, ज्ञानोबा अनवणे, मंचिक पवार, बाबासाहेब मोरे, माजी सरपंच चत्रभूज पवार, परमेश्वर भोसले सर, अनवणे काका, माऊली न्युज मुख्य संपादक पवार अभिजीत, चाकरवाडी ग्रामस्थ, पंचक्रोशीतील भाविक भक्त उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com